महाराष्ट्र शासन

# उपसंचालक आरोग्य सेवा

राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे

लष्कर पाणी पुरवठा आवार, सेंट मेरी शाळेजवळ, पुलगेट, स्टॅव्हले मार्ग, पुणे ४११००१

दूरध्वनी - कार्यालय :- (०२० ) २६३३०५०९/२६३३०२२५

Email : statehealthlab@gmail.com aosphlpune@gmail.com

आरोग्य सेवा

जा.क्र.उसंआसे/रासाआप्र/भांडार/संकेतस्थळावर दरपत्रके प्र/ 8563-64 /२०२५

दिनांक :- 25/11/2025

प्रति,

____________

____________

विषय :- कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांचे आयकर संदर्भातील कामे तसेच केंद्रित अन्न प्रयोगशाळेचे जीएसटी विषयक कामकाज अधिकृत सीए मार्फत करुन घेण्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत.

आपणास कळविण्यात येते की, उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे, या प्रयोगशाळेतील कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आयकर कपात करुन ती रक्कम शासनास भरण्यासाठी अधिकृत सीए मार्फत दर तीमाहीस फॉर्म २६ क्युचे रिटर्न फाईल करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक वर्ष अखेरीस सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे फॉर्म नं १६ ए देणे आवश्यक आहे. तसेच केंद्रिय अन्न प्रयोगशाळेचे जीएसटी विषयक कामकाज व वार्षिक लेखा परिक्षण अधिकृत सीए मार्फत करुन घेणे आवश्यक असल्याने आर्थिक वर्ष २०२५ - २६ साठी अधिकृत सीए मार्फत खालील नमुदकामे करण्याकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे.

दरपत्रके सादर करावयाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ. क्र | कामाचा तपशिल | आकारण्यात येणारी फी | जीएसटी दर | एकुण आकारण्यात येणारी रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२५-२६ करीता अधिकारी /कर्मचारी टीडीएस कपातीचे फार्म नंबर २6 क्युचे रिटर्न फाईल करणे. | | | | |
| २ | सन २०२५-२६ करीता पुरवठादार यांचे टीडीएस कपातीचे फॉर्म नंबर २४ क्यू चे रिटर्न फाईल करणे. | | | | |
| ३ | अधिकारी व कर्मचारी यांचे नंबर १६ ए देणे. | | | | |
| ४ | पुरवठादार यांचे फॉर्म नं १६ देणे. | | | | |
| ५ | केंद्रिय अन्न प्रयोगशाळेचे जीएसटी रिटर्न फाईल करणे. | | | | |
| ६ | केंद्रिय अन्न प्रयोगशाळेचे सन २०२५-२६ चे आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करणे. | | | | |

सदर दरपत्रक सिलबंद लिफाफयात दिनांक  .  .२०२५ रोजी पोहचतील अशा रितीने पाठवावीत. त्यानंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे तसेच सदरील प्रक्रिया पुर्णपणे रद्द करण्याचे अधिकार उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

(श्री. मनोहर. द. धूम)

उपसंचालक आरोग्य सेवा,
राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे

प्रत :-नोटीस बोर्ड / संकेतस्थळ

अटी व शर्ती :-

१) दरपत्रकाच्या लिफाफयावर " Quotation for Offical Income Tax work year 2025-26 " असा स्पष्ट उल्लेख असावा.
२) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेडवर सादर करावी व त्यावर शिक्यासह स्वाक्षरी असावी.
३) दर नमुद करतांना मूळ किंमत (Basic Price), GST चे दर व रक्कम (GST rate &amount ) सवलतीचे रक्कम ( Discount amount) व इतर खर्च स्पष्टपणे वेगवेगळे दाखवावे. मान्य केलेल्या दरा व्यतीरिक्त इतर कोणताही खर्च अदा केले जाणार नाही.
४) दरपत्रकार जीएसटी क्रमांक व पॅन नंबर याचा उल्लेख असावा.
५) दरपत्रकासोबत पॅन कार्ड व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राच्या स्वसांक्षाकीत छायांकीत प्रती ( Self attested xerox copy ) सादर केले असतील तरच दरपत्रक वैध मानण्यात येईल. जीएसटीचे प्रोव्हीजनल नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले दरपत्रक अवैध समजण्यात येतील.
६) दरपत्रके दि.10.12 २०२५ रोजी सकाळी ११ वाजता उघडण्यात येतील. दरपत्रके उघडण्याच्या वेळी संबधीत पुरवठादार / त्यांचे प्रतिनीधी कार्यालयामध्ये उपस्थित रहावे.
७) पुरवठादार संस्थेचे अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.
८) ई-मेल मार्गाने सादर केलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.
९) सेवा पुरवविणा-या व्यक्ती /संस्थेस ०३ -०५ वर्ष कामाचा अनुभव असावा.
१०) पात्र सेवा पुरवविणा-या संस्थेचे देयक दर तिमाही नुसार अदा केले जाईल.
११) पात्र सेवा पुरवविणा-या संस्थेच्या देयकातील शासन नियमावली प्रमाणे १० टक्के टिडीएस कपात करण्यात येईल.
१२) दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे तसेच सदर प्रक्रिया पुर्ण पणे रद्द करण्याचे अधिकार उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

(श्री. मनोहर. द. धूम)
उपसंचालक आरोग्य सेवा,
राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा पुणे